# हरित पर्यावरणाची जबाबदारी सगळ्यांचीच

## डॉ. कलाम : 'विश्व' आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. १८ : हरित पर्यावरण ही काळाचीच नव्हे, तर सर्वांचीच गरज आहे. ते अबाधित राखण्याची आणि वृद्धिंगत करण्याची जबाबदारी सगळ्यांचीच आहे. त्यासाठी येत्या दोन-तीन वर्षांत लक्षावधी झाडे रुजवून ती जगवली पाहिजेत. यासाठी युवकांनी आणि विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी केले. पर्यावरणाच्या प्रश्नांचा मागोवा घेऊन मार्ग शोधण्यासाठी आयोजित केलेल्या 'विश्व' या आंतरराष्ट्रीय परिषदेचे; तसेच प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. कलाम यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते 'इंडिया, द रोड अहेड' या विषयावर बोलत होते.

'दि इन्स्टिट्यूट फॉर स्टडिज इन वेदिक सायन्स' (आयएसव्हीएस) या संस्थेने ही परिषद आयोजित केली आहे. वातावरणातील बदलाविषयी डॉ. कलाम म्हणाले, की ही खरोखरीच गंभीर बाब आहे. आपण चैनीचे जीवन जगत असताना उद्याचा विचार करीत नाही. ३० दशलक्ष गाड्यांतून बाहेर पडणारा कार्बन डायऑक्साईड पर्यावरणाची प्रचंड हानी करीत आहे. हा वायू वातावरणात कमीत कमी प्रमाणात पसरेल याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले पाहिजे. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी सौरऊर्जा, अणुऊर्जा, पवनऊर्जा, जैविक इंधन ही पर्यायी ऊर्जास्रोते उपयोगात आणली पाहिजेत. या वेळी त्यांनी पर्यावरणरक्षणासाठी घर, परिसर, कार्यालय आदी ठिकाणी नित्य उपक्रमातून निसर्गाचे रक्षण करण्याची उपस्थितांना शपथही दिली. या वेळी 'आयएसव्हीएस'चे संचालक डॉ. पुरुषोत्तम राजीमवाले, संयोजक योगेंद्र व्होरा व्यासपीठावर उपस्थित होते.



तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेत पर्यावरणाशी संबंधित विविध विषयांवर चर्चा व कार्यशाळा होणार आहेत. भारतीय परंपरा आणि विश्व यांची सांगड घालण्यासाठी; तसेच शिक्षण आणि शास्त्र यांचा पर्यावरणाशी बंध साधण्यासाठी डॉ. विजय भटकर, डॉ. उमेशचंद्र कुलश्रेष्ठ, गौरव गुप्ता, अल्मित्रा पटेल, डॉ. प्रसाद मोडक, कर्नल मदन देशपांडे आदींचे मार्गदर्शन होणार आहे.